# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०१७ / चैत्र ३, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**<br>**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**<br>**(३) कृषी आणि फलोत्पादन मंत्री**<br>**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**<br>**(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५२**

---

### सुकुरवाडी, बोरीवली (मुंबई) येथील बसस्थानकाची झालेली दुरवस्था

**(१) * ३०३८० श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकुरवाडी, बोरीवली (मुंबई) येथील बसस्थानकाची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बसस्थानकाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) सुकुरवाडी, बोरीवली येथील मुख्य बसस्थानक सुस्थितीत असून, बसस्थानकात ४ फलाट आहेत. बसस्थानकावर ठाणे प्रवाशी शेडच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आले असून, त्यामध्ये शेडची उंची वाढविणे, नवीन मेटाकलर पत्रे बसविणे, विटांचे बेंचेस बांधून ग्रेनाईट लावणे, व्हेट्रीफाईड टाईल्स बसविणे व रंगकाम करणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**अकलूज-पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) या मार्गाची झालेली दुरवस्था**

**(२) * २९६५६ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीक्षेत्र पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा व लाखो भाविक अकलूज-पंढरपूर या जुन्या पालखी मार्गावरून पायी पंढरपूरला येतात, सदर मार्गापैकी पीराची कुरोली पासून २ कि.मी. डांबरीकरण गेली २ वर्षापूर्वी झाले असून सद्य:स्थितीत सदर पालखी मार्गाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पटवर्धन कुरोली पासून पंढरपूर पर्यंतच्या १६ कि.मी. रस्त्याकरीता निधी उपलब्ध करुन सदर रस्त्याची दुरूस्ती, डांबरीकरण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) पंढरपूर पीराची कुरोली-अकलुज रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ४७ असून या रस्त्याची एकूण लांबी २१.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते ४/४०० कि.मी. मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तिर्थविकास आराखड्यामध्ये मंजूर आहे. उर्वरीत लांबीपैकी ९/०० ते ९/७०० कि.मी. या लांबीमधील रस्ता दुरुस्तीचे काम रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ मध्ये मंजूर आहे.

उर्वरीत खराब लांबीचे दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार व निकषानुसार प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**ओणी ते येरडव (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) रस्त्याच्या निकृष्ट कामांबाबत**

**(३) * २९७०९ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओणी ते येरडव (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) रस्त्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये झालेले डांबरीकरण समपातळीत झालेले नसल्याने सदर रस्त्याच्या डांबरीकरण कामाची सुधारणा करावी, अशा मागणीचे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निवेदनांतील तक्रारीनुसार निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) प्रश्नांकित काम स्वीकृत निविदेतील तरतूदीप्रमाणे व योग्य गुणवत्तेचे करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कणकवली-आचरा (जि.सिंधुदुर्ग) या राज्य महामार्गाची झालेली दुरवस्था**

**(४) * ३०२७८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २३९९२ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली-आचरा (जि.सिंधुदुर्ग) या राज्य महामार्गाची दुरवस्था झालेली असून संपूर्ण रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने या मार्गावरुन प्रवास करणाऱ्या वाहन चालकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू राज्य महामार्गाचे दोन टप्प्यांमध्ये डांबरीकरण व पॅचवर्कसाठी रूपये ५ कोटी ६५ लाखांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली येथून शासनास सादर करण्यात आलेला असतानाही आजमितीस सदरहू प्रस्तावास शासनाची मंजूरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावास शासनाची मंजूरी मिळवून कणकवली-आचरा राज्य महामार्गाचे खडीकरण, डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.
(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्त्याची सुधारणा करण्याचे रुपये २९७३६ लक्ष रकमेचे काम मंजूर करण्यात आले आहे. कामाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नेमणूकीचे काम निविदास्तरावर आहे. प्रकल्प अहवाल तयार झाल्यावर कामाच्या निविदा बोलावून काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## नंदुरबार, गुजरात सीमेसह राज्यातील अवैध रेती तस्करी रोखण्याबाबत

**(५) * ३०५०८ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार, गुजरात सीमेसह राज्यात मोठया प्रमाणात रेती तस्करी होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील अवैध रेती तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करून रेती तस्करी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही. तथापि, नंदुरबार गुजरात सीमेवरील यावल व इतर झोनवरून वाळूची चोरटी वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त भाराची वाळू वाहतुक व नियमांचे उल्लंघन करून वाळू वाहतूक सुरू असल्याची तक्रार जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना दिनांक २०/०२/२०१७ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार नंदुरबार व तहसिलदार नवापूर यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असता, सदर प्रश्नाधीन बाब निदर्शनास आलेली नाही.

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीच्या प्रकरणांत गौण खनिजाच्या बाजारभावाच्या ५ पटीपर्यंत दंड आकारणे, उत्खनन व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली यंत्रसामग्री व वाहने जप्त करणे, प्रकरणपरत्वे वाळू तस्करांविरूध्द एम.पी.डी.ए. अधिनियमांतर्गत कारवाई करणे, गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध आणण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची समिती स्थापन करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर पंचायत समिती (जि.सोलापूर) कार्यालयासमोर सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन फुटल्याने दुर्गंधी पसरल्याबाबत

**(६) * २९७०१ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर पंचायत समिती (जि.सोलापूर) कार्यालयाशेजारील पोलीस कर्मचारी वसाहतीमधील सांडपाणी वाहून नेणारे पाईप फुटल्याने घाण पाणी पंचायत समिती आवारात येत असून याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांना निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समिती कार्यालय परिसरातील येणारे सांडपाणी तात्काळ बंद करावे, अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) पंचायत समिती आवारात असलेले इन्स्पेक्शन चेंबर तुंबल्यामुळे सांडपाणी चेंबरमधून बाहेर आलेले होते. याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर यांच्या दिनांक १९/१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, पंढरपूर यांना कळविल्यानुसार दिनांक २३/१/२०१७ रोजी पाहणी करुन चोकअप झालेले चेंबर साफ करुन ड्रेनेज लाईन सुस्थितीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्ह्यात शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या वारसांना लाभ देण्याबाबत**

**(७) * २९९३९ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत १४४ प्रस्तावांपैकी ३७ प्रस्तावांना मंजूरी मिळाली असून उर्वरित वारसांचे ६६ प्रस्ताव विविध कागदपत्रांअभावी व जाचक अटींमुळे शेतकऱ्यांच्या वारसांना विमा योजनेचा लाभ मिळत नसल्याने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शेतकऱ्यांच्या वारसांना अपघात विमा योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) फेब्रुवारी, २०१७ अखेरच्या अहवालानुसार नांदेड जिल्ह्यातील एकूण ११० विमा प्रस्ताव कंपनीकडे दाखल झालेले आहेत. त्यापैकी ६६ प्रस्ताव मंजूर असून १७ विमा दावे नाकारण्यात आलेले आहेत तसेच २७ प्रस्तावांवर कार्यवाही चालू आहे.

(२) प्रस्ताव शीघ्र गतीने मंजूर होणेसाठी जिल्हा तसेच आयुक्तालयस्तरावर विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी यांच्या बैठका घेऊन सातत्याने प्रकरणे निकाली काढणेस्तव सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच त्याबाबत सातत्याने पाठपुरावा चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---------------------

**विदर्भातील दुष्काळग्रस्त गावांना शासन निर्णयान्वये**
**निधी उपलब्ध करुन वाटप करण्याबाबत**

**(८) * २९२८२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील दुष्काळग्रस्त ११,८६२ गावातील कापूस व सोयाबीन अर्थसहाय्याबाबत शासनामार्फत काढण्यात आलेला निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार विदर्भातील शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मिळावे म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) दिनांक ६/१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. निधी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील वापराविना पडून**
**असलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याबाबत**

**(९) * २९३१६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील शहापूर, धेरंड परिसरात टाटा पॉवर कंपनीचा औष्णिक वीज प्रकल्प प्रस्तावित असून सदर प्रकल्पाकरीता गत आठ वर्षापूर्वी शासनाने भूसंपादित केलेल्या जमिनी सद्य:स्थितीत वापराविना पडून असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही खारेपाट विभागात पटनी एनर्जी, सूर्या बल्ब यासारख्या प्रकल्पासाठी शासनाने जमिनी संपादित केल्या होत्या, परंतु तेथेही प्रकल्प आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून वापराविना पडून असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) खारेपाट विभागात पटनी एनर्जी, सुर्या रोशनी या सारख्या प्रकल्पासाठी शासनाने जमिनी संपादित केल्या नाहीत, सदर कंपनीने खाजगी जमिनी खरेदी केल्या आहेत, परंतू प्रकल्प उभा केला नसल्याने सुर्या रोशनी या कंपनीकडून मुळ खातेदारांना जमिनी परत करण्यात आलेल्या आहेत. तसेच पटनी एनर्जी यांनी प्रकल्प सुरुवात केली नसल्याने त्यांच्या विरोधात जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ६३ अ १ व ८४ खाली जमिनी परत घेण्याबाबत नोटीसा तहसिलदार अलिबाग यांनी दिलेल्या आहेत.

मौजे शहापूर, धेरंड परिसरात टाटा पॉवर कंपनीकरीता वाटप करण्यात आलेली जमीन म.औ.वि. महामंडळाने म.औ.वि. अधिनियम १९६१ अन्वये खातेदारांना नुकसान भरपाई अदा करुन रितसर ताबा प्राप्त केला आहे. सदर जमिनी खातेदारांना परत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोळाचा ओढा ते गोडोली (जि.सातारा) या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत**

**(१०) * ३०४७० श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोळाचा ओढा ते गोडोली (जि.सातारा) या रस्त्याचे चौपदरीकरणाच्या कामास तीन वर्षापूर्वी मंजूरी मिळाली असून त्यापैकी मोढाचा ओढा ते करंजीनाका व महालक्ष्मी ते गोडोली पर्यंतचे काम अपूर्ण असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंरजे गावातून जाणारा रस्ता खूपच अरुंद असून वाहनांच्या वर्दळीमुळे शाळेतील मुले व ज्येष्ठ नागरिक यांना रस्ता ओलंडतांना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रश्नांकित प्रकल्पाचे कामास रुपये २३.२० कोटी इतक्या रकमेस मान्यता प्राप्त झाली आहे. प्रस्तुत काम मे.ऐ.एस. देसाई, सातारा या कंत्राटदारामार्फत प्रगती पथावर आहे. आजपर्यंत कामासाठी रु. २१.२० कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

या कामापैकी करंजे गावामध्ये रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक जागा नगरपरिषद सातारा यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदर जागा अद्याप सार्वजनिक बांधकाम विभागास प्राप्त झाली नसल्याने काम हाती घेणे शक्य झालेले नाही. यासाठी आवश्यक जमिनीचा ताबा प्राप्त करुन घेण्यासाठी जिल्हाधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांच्यामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे. भूसंपादन प्रक्रिया होवून जमीन ताब्यात आल्यावर करंजे गावातील रस्त्याचे काम व इतर उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(११) * २७७१३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २४०९५ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानीचा अहवाल जिल्हाधिकारी, परभणी यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तूत प्रकरणी उक्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या नुकसान भरपाईच्या तपशिलाची तालुकानिहाय माहिती काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) सदर कालावधीत झालेल्या नुकसानाबाबत शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१६/प्र.क्र.३२४/म-३, दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजीच्याा शासन निर्णयान्वये बाधित शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) समुद्रात मिनी पर्ससीन मासेमारीवर बंदी आणण्याबाबत**

**(१२) * २९७१८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १४८४९ ला दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) समुद्रात मिनी पर्ससीन नेट धारकांकडून सुरु असलेल्या अनधिकृत मासेमारीबाबत कारवाईची आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणती कारवाई केली जात नसल्याने पारंपारिक मच्छिमारांनी आंदोलन केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या सागरी भागात सुरु असलेल्या मिनी पर्ससीन मासेमारीवर बंदी आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक २६/१२/२०१६ रोजी धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

(२) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत अनधिकृत मासेमारी नौकांवर कारवाई करण्यासाठी ७ सागरी जिल्हयांसाठी ५ गस्ती नौका भाड्याने घेण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कांबा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना परत देण्याबाबत**

**(१३) * ३००४८ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांबा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील सर्व्हे नं.४७/१ भूखंड आदिवासी शेतकऱ्यांच्या मालकीचे असतांना भूमाफीया प्रकाश बुधरानी व त्यांच्या कुंटुबियांनी सदर शेतकरी राजस्थान येथून आल्याबाबतचा बोगस दाखला मिळवून या गावातील गरीब आदिवासींच्या जमिनी बळकावल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासींच्या जमिनी त्यांना परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कृषी विभागातील कृषीसेवकांच्या परिक्षेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१४) * २६८७५ श्री.शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, डॉ.अपूर्व हिरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी विभागात ७३० कृषी सेवक पदांच्या घेण्यात आलेल्या परिक्षेत झालेल्या गैरव्यवहारामुळे कृषी सेवक भरती परिक्षा व निवड यादी रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय, हे खरे आहे.

कृषी सेवकांची ७३० रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेव्दारे दिनांक ०६/०८/२०१६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली व त्याआधारे दिनांक ०६/०९/२०१६ रोजी निवड यादी घोषित करण्यात आलेली होती. परीक्षेच्या निकालानंतर सदर परीक्षेत गैरप्रकारांचा अवलंब झाल्याबाबत परीक्षार्थींनी विविध माध्यमांतून तक्रारी केलेल्या होत्या. प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने आयुक्त (कृषी) तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल प्राप्त झालेला आहे. सद्यस्थितीत त्यानुषंगाने दिनांक २०/०१/२०१७ रोजी सदर परीक्षा व निवड यादी रद्द करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणात प्रथमदर्शनी दोषी आढळून आलेल्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेस कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून सदर नोटीशीबाबतचे त्यांचे स्पष्टीकरण प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने पुढील चौकशी सुरु असून चौकशीत दोषी आढळणाऱ्यांविरुध्द आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कासार्डे, ता.कणकवली व मौजे आचिर्णे, ता.वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत

**(१५) * २९४७३ श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक १५४९३ ला दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कासार्डे, ता.कणकवली व मौजे आचिर्णे, ता.वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) येथे नियमांचे उल्लंघन करून सिलीका वाळूचे उत्खनन सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाणपट्ट्यामध्ये सिमाकणांचे स्तंभ उभारण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तूत खाणपट्ट्यासाठी पर्यावरण व पर्यटन विभागाची मंजूरी घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून वाळू उपसा करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) होय.

(३) व (४) प्रस्तुत खाणपट्टयासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेण्यात आली आहे. खाणपट्टा मंजूर करण्यापूर्वी पर्यटन विभागाची मंजूरी घेण्याची तरतुद नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे गुरधाळ (ता.उदगीर, जि.लातूर) येथील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(१६) * २८९१४ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुरधाळ (ता.उदगीर, जि.लातूर) येथील शेतकऱ्यांची जमीन सन १९७६ मध्ये घरकुलासाठी संपादित करुन सदर जमिनीचा मोबदला देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांनी जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत अनेक वेळा शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. मौ.गुरधाळ, ता.उदगीर येथील गावठाण विस्तार करिता जमीन संपादन प्रकरणात दिनांक २१/०८/१९७५ रोजी आवार्ड झाला असून दिनांक २५/०३/१९७६ रोजी जमीन मालकांना मावेजा वाटप करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सायन हॉस्पिटल येथील बसस्थानकाची दुरुस्ती करणेबाबत

**(१७) * २९२४६ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सायन हॉस्पिटल येथील बसस्थानकाच्या दुरुस्तीचे काम गेल्या एक ते दीड वर्षापासून अर्धवट सोडण्यात आले असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रवाशांनी वेळोवळी तक्रार करुनही राज्य परिवहन महामंडळाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर बसस्थानकाचे नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) मुंबईतील सायन हॉस्पिटल येथील बसस्थानकावर झाड पडल्याने वाहतूक नियंत्रक कक्ष व वेटींग हॉलची पडझड झाली होती. सदर बसस्थानकाच्या दुरुस्तीचे काम ऑक्टोबर, २०१६ मध्ये सुरु करण्यात येवून सदरचे काम जानेवारी, २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील वापराविना पडून असलेल्या जमिनी शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत

**(१८) * २७१३७ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील जमिनीचा शर्तभंग केल्याप्रकरणी व अनेक वर्षापासून वापराविना पडून असलेल्या सुमारे ७२ एकर जमिनी ताब्यात घेण्याचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने शासनाला पाठविला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थांना दिलेल्या जमिनी या माजी राष्ट्रपती, माजी उपमुख्यमंत्री, माजी महसूल मंत्री, माजी अर्थमंत्री, माजी सहकार मंत्री यांच्याशी संबंधित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) पुणे जिल्ह्यातील विविध संस्थांना विविध प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या तथापि, वापराविना पडून असलेल्या काही जमिनींच्या शर्तभंगाच्या बाबतीत जिल्हा प्रशासनाकडून शासनास अहवाल प्राप्त झाले आहेत. सदर जमिनीचे वाटप त्या त्या वेळी पात्र अर्जदार व्यक्ती/संस्थांना करण्यात आले होते.
(३) जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त शर्तभंग प्रस्तावांतील संस्थांपैकी काही संस्थांबाबत शर्तभंगापोटी जमीन शासन जमा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. काही संस्थांना इमारत बांधकामासाठी मुदतवाढ देण्यात आलेली असून उर्वरीत संस्थांबाबतची कार्यवाही सुरु आहे.

विविध व्यक्ती, संस्था आणि कंपनी यांना विविध प्रयोजनार्थ कब्जेहक्काने अथवा भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील इमारत बांधकामासाठी मुदतवाढ देण्याबाबत शासनाने दिनांक ११ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे प्रकरण परत्वे पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१९) * २७४३३ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील निरगुंडी नदीवर वसलेल्या पोयनार लघुपाटबंधारे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन योग्यप्रकारे झालेले नसुन पुनर्वसनामध्ये अनेक त्रुटी असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पात बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही
(२) प्रश्न उद्‌भवत नाही
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांची प्रकरणे मदतीविना प्रलंबित असल्याबाबत**

**(२०) * २७४४८ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंदराव पाटील, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील सन २०१६ मधील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या १०५३ प्रकरणांपैकी ७०४ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाने मदत दिली असून बीड, उस्मानाबाद, नांदेड व औरंगाबाद या जिल्ह्यातील उर्वरित प्रकरणे मदतीविना प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
मराठवाड्यात सन २०१६ मध्ये एकूण १०५३ शेतकरी आत्महत्येची प्रकरणे झालेली असून त्यापैकी ७५४ प्रकरणे पात्र व २९५ प्रकरणे अपात्र झालेली आहेत.

नांदेड जिल्ह्यात ३ व लातूर जिल्ह्यात १ अशी केवळ ४ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात प्रादेशिक परिवहन कार्यालयात चाचणी ट्रॅक उभारण्याबाबत

**(२१) * २९३६३ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये (आरटीओ) फिटनेस चाचणीसाठी येणाऱ्या बसगाड्यासह अवजड वाहनांची चाचणी घेण्यासाठी किमान अडीचशे फूट लांबीचे चाचणी ट्रॅक उपलब्ध करुन देण्याबाबतचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिलेले असतांनाही चाचणी ट्रॅक उभारण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रादेशिक परिवहन कार्यालयात चाचणी ट्रॅक उभारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये फिटनेस चाचणीसाठी येणाऱ्या वाहनांची चाचणी घेण्यासाठी २५० मी. लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

राज्यात ५० प्रादेशिक परिवहन कार्यालय असून, २ कार्यालयामध्ये ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्यात आलेले असून, उर्वरित कार्यालयांपैकी ४४ कार्यालयामध्ये ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर ब्रेक टेस्ट ट्रॅक चाचणी पथ उभारण्यासाठी ३८ प्रादेशिक परिवहन कार्यालयात जागा उपलब्ध झाली असून, १० कार्यालयातील ब्रेक टेस्ट चाचणी पथ उभारण्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या ४४ कार्यालयांपैकी २७ कार्यालयात ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारणीसाठी संबंधित बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील ब्रिटीशकालीन व सुरक्षा कालावधी संपलेल्या पुलावरील वाहतुक बंद करून पर्यायी उपाययोजना करण्याबाबत

**(२२) * २७८३० डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३६९४ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील ब्रिटीशकालीन व ज्या पुलांची सुरक्षा कालावधी संपली आहे, अशा पुलांचे बांधकाम लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याबाबतची प्रगतीत असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, स्ट्रक्चरल ऑडीटचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, अहवालातील निष्कर्षांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व नाशिक जिल्हयात एकूण किती पुलांचे पुनर्बांधणीबाबत शिफारस करण्यात आलेली आहे,

(३) असल्यास, नाशिक येथील मुंबई महामार्गावर असलेला व वाहतुकीस धोकादायक ठरलेल्या कन्नमवार पुलाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्याचे दृष्टीने सुरु असलेली निविदा प्रक्रिया पुर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कन्नमवार पुलाच्या पुनर्बांधणीबाबत तसेच नाशिक जिल्हयातील ब्रिटीशकालीन व ज्या पुलांची सुरक्षा कालावधी संपलेली आहे, अशा पुलांचे पुनर्बांधणीचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नाशिक जिल्हयात एकुण ९ ब्रिटीशकालीन पूल आहेत. त्यापैकी पाच पूल सुस्थितीत आहेत. दोन पूलांसाठी नवीन समांतर पूल बांधले आहेत. एका नवीन पुलाचे बांधकाम सुरू आहे. एका पुलाची दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

सदर दुरुस्तीचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) मुंबई-आग्रा महामार्ग गोदावरी नदीवरील कन्नमवार पूल भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्या अखत्यारीत आहे व या पूलाच्या पुनर्बांधणीची निविदा प्रक्रिया केंद्र शासनामार्फत सुरू आहे.

(४) प्रश्नांकित पूल कमकुवत झाल्याने भूतल परिवहन मंत्रालय नवी दिल्ली यांच्या मार्फत नवीन पूल बांधण्याच्या कामाच्या निविदा बोलावण्यात आल्या आहेत. नाशिक जिल्ह्यात एकूण ९ ब्रिटीशकालीन पूल आहेत. त्यापैकी पाच पूल सुस्थितीत आहेत. दोन पूलांशेजारी नवीन समांतर पूल बांधले आहेत. एका पुलाचे बांधकाम सुरू आहे. एका पुलाची दुरूस्ती करण्याचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ नगरपरिषद हद्दीत जाणाऱ्या जव्हार, खोपोली या राज्य महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२३) * २९९२३ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ नगरपरिषद हद्दीत जाणाऱ्या जव्हार-खोपोली या राज्य महामार्गाचे काम अत्यंत निकृष्ट झाल्याने व अपूर्ण राहिल्यामुळे या ठिकाणी वारंवार अपघात होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या राज्य महामार्गाचे काम पूर्ण केले नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय तेथील नागरीकांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२), (३) व (४) अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील रस्त्यावरील मटका चौक ते फॉरेस्ट नाका पर्यंत माहे मे, २०१५ मध्ये व साईबाबा मंदिर ते रिलायन्स पेट्रोल पम्प दरम्यानची माहे जानेवारी, २०१६ मध्ये अतिक्रमणे निष्काशित केलेल्या जागेमध्ये रस्ता रुंदीकरण करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच अंबरनाथ नगरपरिषद यांच्याकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त झाली आहे. सदर काम नव्याने करणे अपेक्षित असल्याने या कामास सुमारे रुपये ३५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर छाननी करण्यात येत आहे.

-----------------

## लिव्ह लायसन कराराच्या दस्तऐवजाची मुद्रांक विभागाकडे सक्तीने नोंदणी करण्याबाबत

**(२४) * २८९७६ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत विविध पडताळणीसाठी पोलीस ठाण्यामध्ये नागरिकांकडून सादर करण्यात येणारे लिव्ह लायसनचे दस्तऐवज मुद्रांक विभागाकडे नोंदणी करणे सक्तीचे केल्याबाबत नोंदणी महानिरिक्षकानी सर्व पोलीस ठाण्यात दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास सूचना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर उपनगरात मोठया प्रमाणात करार करून दस्तऐवज मुद्रांक विभागात नोंदणी करीत नसल्याची बाब विचार घेता याबाबत शासनाने स्वतंत्र यंत्रणा नेमून व त्याद्वारे सर्वेक्षण करून लिव्ह लायसन कराराची नोंदणी करून जास्तीत जास्त महसूल शासनास मिळवून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुंबई शहर उपनगरात साधारणतः लिव्ह लायसन करार नोंदणी न केलेल्या व नोंदणी केलेल्या ग्राहकांची एकूण संख्या किती आहे व नोंदणी न केलेल्या ग्राहकांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा, १९९९ च्या कलम ५५ मधील तरतूदीनुसार लिव्ह ॲण्ड लायसेन्सचे दस्त नोंदणीकृत करणे सक्तीचे आहे. एखाद्या मिळकतीमध्ये भाडेकरू ठेवत असताना त्याची माहिती संबंधित पोलीस स्टेशनला देण्याच्या प्रक्रियेंतर्गत पोलीस पडताळणी करीत असताना उक्त दस्तऐवज नोंदणीकृत/नोटराईज्ड आढळल्यास त्याची माहिती संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांना देण्यासाठी सर्व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना निर्देश देण्याची विनंती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ०६/१२/२०१६ च्या पत्रान्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य यांनी केली आहे.

(२) व (३) मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यात विविध भागात सदनिका लिव्ह ॲण्ड लायसेन्सने देणे ही निरंतर सुरू असलेली प्रक्रीया असल्यामुळे सर्वेक्षणातून मिळणारी माहिती ही लगेच कालबाह्य ठरू शकते. त्यामुळे स्वतंत्र यंत्रणा नेमून लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारांचे सर्वेक्षण करणे हा मार्ग व्यवहार्य वाटत नाही.

मागील ३ वर्षात मुंबई शहर व मुंबई उपनगर मध्ये ३,५६,६०५ इतक्या लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनाम्यांच्या दस्तांची नोंदणी करण्यात आली आहे. नोंदणी न केलेला दस्त निदर्शनास आल्यास असा दस्त ताब्यात घेण्यात येतो व मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुद्रांक आकारणी निश्चित करून मुद्रांक शुल्क वसूल केले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड शहरालगत पालवण व पिंगळे तरफ या रेल्वेच्या जंक्शनसाठी भूसंपादनात झालेला गैरव्यवहार**

**(२५) * ३०५१० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरालगत पालवण व पिंगळे तरफ या ठिकाणी रेल्वेच्या जंक्शनसाठी भूसंपादन करण्यात आले असून या भूसंपादनात शेतकऱ्यांच्या जमिनी रेल्वेत जाणार असल्यामुळे जमिनी कमी भावात विकत घेऊन शेतकऱ्यांची फसवणुक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या भागातून रेल्वे जाणार होती त्या भागातील जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहारावर बंदी आणणे आवश्यक असतांनाही जिल्हाधिकारी कार्यालयाने शेतकऱ्यांना नोटीसीमार्फत कळविणे आवश्यक असूनही कळविले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रेल्वेच्या भूसंपादनामध्ये रेल्वे अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संगनमताने जमीन खरेदी-विक्री व रेल्वे भूसंपादनामध्ये गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूसंपादित शेतकऱ्यांना मावेजा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

अशा प्रकारची तक्रार/निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या कार्यालयाकडे अद्याप पर्यंत प्राप्त झालेली नाही.

(२) रेल्वेच्या जंक्शनासाठी जमिनीचे भूसंपादन तातडीने होण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे, २०१५ आणि दिनांक ३० सप्टेबर, २०१५ नुसार थेट खरेदी पध्दतीव्दारे राबविण्यात येत आहे. त्यानुसार जमीन मालकांना जिल्हाधिकारी, बीड कार्यालयामार्फत लेखी नोटीसा देवून त्यांच्याकडून संमतीपत्र प्राप्त करण्यात आलेली आहेत.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणात नगर रचनाकार, बीड यांचेकडून जमिनीच्या दराबाबत प्राप्त शिफारशीस अनुसरून जिल्हास्तरिय समितीच्या बैठकीत थेट खरेदीच्या मूल्यांकन दरास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे गैरव्यवहाराचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सदर प्रकरणी नियमानुसार प्रक्रिया पूर्ण करून अंतिम मूल्यांकन तक्ता प्रसिध्द करण्यात आलेला आहे. रेल्वे विभागाकडे निधीची मागणी करण्यात आली आहे. रेल्वे विभागाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर निधी वाटपाची दक्षता जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन अनुदान देण्याबाबत

**(२६) * ३०५३० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना ठिबक सिंचन संचासाठी अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सोलापूर जिल्ह्यातील सन २०१३-१४ या वर्षी ठिबक सिंचन संच बसविलेल्या शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) सोलापूर जिल्हयात सन २०१३-१४ या वर्षात सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या शेतकऱ्यांकडून प्राप्त अर्जापैकी २३१४२ लाभार्थ्यांचे अर्ज पात्र ठरले आहेत. त्यासाठी रुपये ५६.२१ कोटी एवढ्या निधीची आवश्यकता आहे. प्राप्त अर्जापैकी १२३३२ लाभार्थ्यांच्या अनुदानाची रक्कम रु.३६.६६ कोटी त्यांच्या बँक खात्यावर आरटीजीएस व्दारे जमा करण्यात आली आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरित ८८१२ लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हवामान अनुकूल कृषी प्रकल्पाचा आराखडा तयार करून अमंलबजावणी करण्याबाबत**

**(२७) * २९७११ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवामानानुसार कोणते पीक कधी व कशा पध्दतीने घ्यावे याबाबत हवामान अनुकूल कृषी प्रकल्प जागतिक बॅकेच्या आर्थिक सहाय्याने राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचा अंमलबजावणी आराखडा तयार करण्याचे काम पुर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून हवामान अनुकूल कृषी प्रकल्प राबवून त्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) हवामान बदलानुकुल कृषी विकासाकरिता जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने हवामान अनुकूल कृषी प्रकल्प (PoCRA) राबविण्यास शासन निर्णय दिनांक ७ जुलै, २०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सद्यस्थितीत जागतिक बँकेच्या चमूच्या मार्गदर्शनाखाली सदर प्रकल्पाचा अंमलबजावणी आराखडा (PIP) तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे महामार्गावरील अपघात रोखण्याबाबत

**(२८) * ३०५६१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे महामार्गावर सातत्याने होणारे अपघात रोखण्यासाठी मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली माहे जून, २०१६ मध्ये झालेल्या बैठकीत इंटेलिजन्ट्स ट्राफीक मॉनिटरी सिस्टीमचा निर्णय घेण्यात आला असून सदर निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गावर ओझर्डे येथे बांधून तयार असलेल्या ट्रॉमा केअर सेंटरमध्ये सेवा सुरू करावी अशा सुचनाही त्यावेळी देण्यात आलेल्या असतानाही आजमितीस सदरहू ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी इंटेलिजन्ट्स ट्राफीक मॉनिटरी सिस्टीमचा घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ओझर्डे येथील ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारीवृंद उपलब्ध करुन देण्याची सार्वजनिक आरोग्य विभागास विनंती केली आहे.

(३) मुंबई-पुणे महामार्गावर सातत्याने होणारे अपघात रोखण्यासाठी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली वाहतूक पोलीस, परिवहन व माहिती तंत्रज्ञान विभागाचे सदस्य यांची समिती गठीत करण्यात आली आहे. अपघात रोखण्यासाठी इंटेलिजन्ट्स ट्राफीक मॉनिटरी सिस्टीमबाबत या समितीच्या यासंदर्भात दोन बैठका झाल्या असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोळा ते किडबिसरी (ता.सांगोला, जि.सोलापूर) रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२९) * २९७४५ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळा ते किडबिसरी (ता.सांगोला, जि.सोलापूर) रस्त्याची दुरवस्था झाल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील ठिकाणी काटेरी झाडांचे साम्राज्य निर्माण झाले असल्याने रस्त्याचे काम करताना रोडवरील झुडपे न काढल्यास आंदोलन करण्याचा इशारा कोळा ग्रामपंचायतीच्या माजी सदस्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) रस्त्याची दुरवस्था झाली आहे हे खरे नाही.
(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) कोळा ते किडबिसरी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.७० असून त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. आहे. संपूर्ण रस्ता डांबरी पृष्ठभागाचा आहे. या रस्त्याचा पृष्ठभाग सुस्थितीत असून वाहतुकीस योग्य आहे.

सदर रस्त्याच्या दोन्ही बाजुस असलेली काटेरी झाडे झुडपे मैलमजूरामार्फत काढलेली आहेत. रस्ता वाहतुकीस सुरळीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उमरी (जि.नांदेड) तालुक्यात अवैधरित्या मुरुम उत्खनन होत असल्याबाबत**

**(३०) * २९९४० श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव ते बळेगाव (ता.उमरी, जि.नांदेड) या रस्त्यावरील मुरुमासाठी अवैधरित्या डोंगर पोखरला असून तळेगाव शिवारातील सर्वे नं.१६० ला लागून असलेल्या डोंगराचे खोदकाम जे.सी.बी. मशीनच्या सहाय्याने १०० ब्रास मुरुमाच्या रॉयल्टीवर हजारो ब्रास मुरुम स्थानिक प्रशासनाच्या संगनमताने सर्रास काढल्या जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) "मुरूमासाठी अवैधरित्या डोंगर पोखरला" अशा आशयाची बातमी एका वृत्तपत्रात दिनांक १९/०१/२०१७ रोजी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, तळेगाव शिवारातील डोंगराचे खोदकाम होत असल्याचे तसेच १०० ब्रास मुरूमाच्या उत्खननाच्या परवानगीवर हजारो ब्रास मुरूम उत्खनन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील ७/१२ चे उताऱ्यांची नोंदी अद्‌ययावत करण्याबाबत**

**(३१) * २९२८४ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील ७ लाख शेतकऱ्यांच्या ७/१२ चे उतारे अद्‌ययावत करण्याचे काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार दोन महिन्यात सदर शेतकऱ्यांच्या ७/१२ चे उतारे अद्‌ययावत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) "ई-फेरफार" कार्यक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील सर्व तालुके दिनांक २०/०७/२०१५ ते १३/०६/२०१६ या कालावधीत ऑनलाईन झालेले असून हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ व संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मध्ये तफावती आढळल्यास त्यामधील तफावती दुरुस्तीसाठी शासनाने "ई-फेरफार" आज्ञावली संदर्भात एडिट मोड्यूल व ऑनलाईन डाटा अपडेशन-२ (ODU-२) असे दोन मोड्यूल्स तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन दिलेली आहेत.

सदर एडीट मोड्यूलचा वापर करुन संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ शी जुळविण्याचे काम यवतमाळ जिल्ह्यात सुमारे ८५.४२ टक्के पर्यंत पूर्ण झाले असून सदरचे काम दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत १०० टक्के पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत.

-----------------

**घोटी-काळुस्ते (ता.इगतपुरी, जि.नाशिक) रस्त्यावरील**
**अनावश्यक ठिकाणी बांधण्यात येणाऱ्या पुलाबाबत**

**(३२) * २९२४० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोटी-काळुस्ते (ता.इगतपुरी, जि.नाशिक) रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अनावश्यक ठिकाणी पूल बांधण्याचे काम सुरु असून सदर पुलाच्या बांधकामासाठी अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त अनावश्यक ठिकाणी पूल बांधण्यामागील कारणे काय आहेत, तसेच अनावश्यक ठिकाणी पूल बांधण्यास परवानगी देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द तसेच कंत्रादाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) घोटी-काळुस्ते हा प्रजिमा २३ आहे. रस्त्याच्या किमी ०/५०० मधील पूल पूररेषेखालील (submersible) आहे. तसेच पूल ६० वर्षे जुना आहे. या बाबीचा विचार करून शासनाने पावसाळयात वाहतूक खंडीत होवू नये या दृष्टीकोनातून पुलासाठी पर्यायी नवीन उंच पातळीवरील (High level) पूल बांधण्याचे काम मंजूर केले. या नवीन पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. पूलाचे काम स्वीकृत निविदेतील तरतूदीप्रमाणे करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कराड (जि.सातारा) तालुक्यात शेतकऱ्यांच्या मालाची साठवणूक करण्यासाठी कोल्ड स्टोरेजची व्यवस्था करण्याबाबत

**(३३) * ३०४७१ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या कृषी विभागातील कृषी सहायकांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेती मालाची नोंदी ठेवणे आवश्यक असतांनाही शेतकऱ्यांच्या बांधावर न जाता पिकांच्या नोंदी कागदोपत्री घेतली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाने शेतमालाच्या उत्पादनाच्या प्रत्यक्षात माहिती शासनाला दिली असती तर आवक झालेल्या मालावर दराचे नियंत्रण ठेवणे सोपे झाले असते, परंतु येथील कृषी विभागाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बेजबाबदार कृषी सहायकांवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांच्या मालाची साठवणूक करण्यासाठी कोल्ड स्टोरेजची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) कृषी सहाय्यकांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेंतर्गत कोल्ड स्टोअरेज उभारणीसाठी वैयक्तिक शेतकऱ्यांना व शेतकरी गटासाठी अनुदानावर योजना सुरु आहे. सन २००५-०६ पासून २०१५-१६ पर्यंत फळपिकांची शितगृहांमध्ये साठवणूक करण्याच्या अनुषंगाने कराड तालुक्यातील ३६४०.१२ मे.टन क्षमतेच्या एका शीतगृहाकरीता ९३.३६ लाखाचे अनुदान देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणासह इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३४) * २६८७३ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोव्याला मुंबईशी जोडणाऱ्या महामार्गावर चार लेन करण्यासह हेलिपॅड, स्थानिक उत्पादनांची विक्री केंद्र, हॉटेल्स इ. जवळपास १३०० सुविधा देण्याबाबतचा व महामार्ग पूर्ण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे, यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ॲम्बुलन्स, प्रथमोपचार सुविधा, प्रसाधन गृहे, वाहनांसाठी पार्कींग इत्यादी ह्या किमान साधारण सुविधा उपलब्ध होणार आहेत.

मुंबई-गोवा ह्या ४७५.२१ कि.मी. राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ पैकी पनवेल ते इंदापूर ह्या ८४ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रकल्प भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून खाजगीकरणामधून प्रगतीत आहे.

सन २०१६-१७ मध्ये त्यापुढील इंदापूर ते झाराप ह्या ३६६.१७ कि.मी. च्या महामार्गापैकी ३१८.०७ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी केंद्र शासनाकडून रुपये ९५०१.१८ कोटीच्या कामांना मंजूरी प्राप्त झालेली आहे. उर्वरीत ४८.१ कि.मी. लांबीच्या कामाचा मंजूरी प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती तालुक्यामध्ये पुरामुळे बाधित झालेल्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३५) * २९८९२ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसदा, देवरी, सालोरा बु. देवरा, रेवसा, शिराळा, टेंभा, फाजलपुर, थुगाव, वलगाव (ता.जि.अमरावती) या गावातील सन २००७ मध्ये आलेल्या महापुरामुळे बाधित झालेल्या कुटुंबाचे पुर्णत: पुनर्वसन झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांमध्ये नागरी सुविधांचे कामे अपूर्ण असून पुनर्वसनाकरिता रुपये १३.६२ कोटी निधीची आवश्यकता असून सदर निधी उपलब्ध करुन देण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे दिनांक १३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गावांची पुनर्वसनाची कामे पुर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडून अहवाल मागविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत**
**कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३६) * २८९१६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.रविंद्र फाटक, श्री.जयंत पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा, विक्रमगड, मोखाडा आणि जव्हार (जि.पालघर) या तालुक्यात जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कोट्यवधी रुपयांची बोगस बीले सादर करून रूपये ३०० कोटींचा अपहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) प्रश्नांकित बाबी बाबत अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्याकडून चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

**पोलादपूर (जि.रायगड) रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३७) * ३०३५० श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वाकण, खांडेश्वरवाडी, रोहिदासवाडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) या मागासवाडीतील अंतर्गत ५०० मीटर लांबीचा अंतर्गत वाडीजोड रस्त्याचे मजबुतीकरण, डांबरीकरण करण्यासाठी ग्रामस्थांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, जिल्हाधिकारी, रायगड, उपअभियंता, सा.बा.विभाग, पोलादपूर यांचेकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही सदरहू रस्त्याचे काम करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) प्रश्नांकित रस्त्याची एकूण लांबी ९०० मी. आहे. त्यापैकी वाकण जाधववाडी ते खांबेश्वरवाडी हा ग्रामीण मार्ग क्र. ८३ असून त्याची लांबी ६०० मी. आहे. या लांबीमध्ये मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१६-१७ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत मंजूर आहे.

उर्वरीत खांबेश्वरवाडी क्र. १ ते रोहिदासवाडी हा ३०० मी. लांबीचा योजनाबाह्य रस्ता असल्याने त्याचे काम रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमामधून करता येत नाही. तथापि सदर काम आमदार / खासदार / लोकप्रतिनिधी यांनी स्थानिक विकास योजनेंतर्गत सुचविल्यास व त्यास मंजूरी प्राप्त झाल्यास जिल्हा परिषदेमार्फत करता येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोमवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथे अननस बागेला आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याबाबत

**(३८) * २८०७६ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साटेली भेडशी परिसरातील (जि.सिंधुदुर्ग) भोमवाडी येथे अननस बागेला आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, तसेच झरे काजुळवाडी येथील लागवड केलेल्या शेकडो काजू कलमे, आंब्याची झाडे, बांबुची बेटे आगीमध्ये जळून गेल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार आगीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) माहे जानेवारी मध्ये लागलेल्या आकस्मिक आगीमध्ये मौजे साटेली भेडशी (भोमवाडी) येथील एका शेतकऱ्याचे तसेच झरे या गावातील एका शेतकऱ्याचे मिळून एकूण ४.०३.६ हे. आर इतक्या क्षेत्रातील फळझाडे यांचे नुकसान झाले आहे. सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव वाढवून देण्याबाबत**

**(३९) * २७२२३ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २२८३४ ला दिनांक २९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उत्तर महाराष्ट्र, विदर्भ तसेच अन्य भागात कापूस हे प्रमुख पीक असून यावर्षी कापसाला हमी भावापेक्षाही रुपये ५०० कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असून यावर्षीचे दर ठरविण्यासाठी केंद्रीय कृषी मूल्य आयोगाने राज्यातील कृषी विद्यापिठासह पणन तज्ञांनी पीक उत्पादन खर्चाच्या अनुषंगाने पिकाच्या आधारभूत किंमती अद्याप जाहिर केलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, कापूस पीकाला उत्पादन खर्च हा एकरी २० ते २५ हजारांपेक्षा अधिक असताना शासनाने जाहीर केलेला दर शेतकऱ्यांना परवडणारा नसल्याने शासनाने हमी भाव वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) खरीप विक्री हंगाम सन २०१६-१७ मध्ये कापसाचे बाजारभाव हे हमी भावापेक्षा जास्त आहेत.

खरीप विक्री हंगाम सन २०१६-१७ करीता केंद्र शासनाने दिनांक ०३/०६/२०१६ रोजी पिकांच्या किमान आधारभूत किंमती जाहीर केलेल्या आहेत.

खरीप विक्री हंगाम सन २०१७-१८ करीता पीक उत्पादन खर्चावर आधारीत किंमतीची राज्य शासनाची शिफारस केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगास पाठविण्यात आलेली असून, किमान आधारभूत किंमती माहे जून, २०१७ मध्ये जाहीर होतील.

(२) किमान आधारभुत किंमत जाहीर करणे ही पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब असून शेतकऱ्यांना किमान हमी भाव वाजवी मिळावेत यासाठी राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घेत असते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बिरोली व मुंडीपार (ता.तिरोडा, जि.गोंदिया) येथील अवैध रेती उत्खनन रोखण्याबाबत

**(४०) * २९४८१ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिरोली व मुंडीपार (ता.तिरोडा, जि.गोंदिया) येथील रेती घाटवर नियमांचे उल्लंघन करून २४ तास रेती उत्खनन व वाहतुक होत असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध रेती उत्खनन रोखण्याकरीता २५० स्थानिक नागरीकांनी उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अवैध रेती उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) समस्त गावकरी यांनी तिरोडा तालुक्यातील बिरोली व मुंडीपार या लिलाव झालेल्या वाळूगटांतून शासनाच्या नियमांनुसार वाळूचे उत्खनन होत नसल्याने, उत्खनन बंद करण्याबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकारी, तिरोडा व तहसिलदार तिरोडा यांना दिनांक ०१/०२/२०१७ रोजी दिले आहे.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने तालुका स्तरावरील भरारी पथकाने सदर वाळूगटांची दिनांक ६/०२/२०१७, दिनांक ७/०२/२०१७, १३/०२/२०१७ व १४/०२/२०१७ रोजी पहाणी व तपासणी केली असता, संबंधित लिलावधारकांकडून शासकीय नियमांचे उल्लंघन करून, वाळूचे उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळाने एम.एस. या धातुमध्ये गाड्यांची बांधणी करण्याचा घेतलेला निर्णय**

**(४१) * २७८३२ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २५५९७ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने अपघात झाल्यास त्याची तीव्रता कमी व्हावी आणि वाहन अधिक मजबुत व आकर्षक करण्यासाठी एम.एस. या धातुमध्ये बसचा सांगाडा बांधण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबतची निविदा प्रक्रिया राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर प्रसारित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अपघाताप्रसंगी तीव्रता कमी व्हावी, प्रवाशांचे संरक्षण व्हावे, यासाठी स्टीलपासून बांधलेल्या गाड्या अधिक मजबुत ठरणार असल्याने निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाचे वाहन अधिक मजबूत व आकर्षक करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने लोखंडी बांधणीचा बसचा सांगाडा बांधण्याचा निर्णय घेतलेला असून, त्याबाबतची निविदा प्रक्रिया राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैतरणा, भाईदर, नायगाव (जि.पालघर) रेल्वे पुलाच्या निषिध्द क्षेत्रामधून होत असलेला रेती उपसा रोखण्याबाबत

**(४२) * २९११९ श्री.सुजितसिंह ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैतरणा, भाईदर, नायगाव (जि.पालघर) रेल्वे पुलाच्या निषिध्द क्षेत्रामधून बेसुमार वाळू उपसा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाळू उपसामुळे रेल्वे पुल धोक्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रेल्वे पुलाच्या निषिध्द क्षेत्रामधून होत असलेला वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) पश्चिम रेल्वेने दिनांक १०/८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये वैतरणा नदीवरील ९२ व ९३ क्रमांकाच्या रेल्वे पुलाच्या सभोवती वाळू उत्खनन बंद करण्याबाबत विनंती केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडे यासंदर्भात दिनांक २०/८/२०१६ रोजी प्रधान सचिव (महसूल), विभागीय आयुक्त, कोकण विभाग, जिल्हाधिकारी पालघर, पोलीस अधिक्षक, पालघर व चिफ ब्रीज इंजिनियर (पश्चिम रेल्वे) यांची बैठक आयोजित करुन, सदर बैठकीत उक्त रेल्वे पुलाजवळील रेतीचे अवैध उत्खनन थांबविण्याबाबत विविध उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जिल्हा प्रशासनाला व इतर संबंधितांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

रेल्वे पुलांच्या निषिध्द क्षेत्रातील वाळू उपसा रोखण्यासाठी रेल्वे पोलीस व महसूल प्रशासनाने वेळोवेळी एकत्रित भेटी देऊन सर्व रेल्वे पुलांच्या ठिकाणी एकाचवेळी पाहणी करणे, पुलांचे सर्वेक्षण करणे, अशा भागातून वाळू वाहतूकीसाठी तयार केलेले रस्ते त्वरीत बंद करणे, जिल्हा व तालुकास्तरावर तपासणी नाके तयार करून, दिवसरात्र पथके गठीत करणे इ. उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सदर रेल्वे पुलांच्या निषिध्द क्षेत्रात वाळूचा उपसा होत असल्याचे अलिकडे निदर्शनास आले नाही.

-------------------

**गेवराई (जि.बीड) तालुक्यातील गोदावरी नदी पात्रातून अवैध रेती उपसा होत असल्याबाबत**

**(४३) * ३०५१३ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यातील गोदावरी नदी पात्रातून वाळू उपसण्याचे काम शासकीय निविदा काढून ठेकेदारांना दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळु उपसा होत असल्यामुळे गोदावरीच्या पात्रातुन क्रेनच्या सहाय्याने उपसा करण्यात येतो व टीपर, ट्रॅक्टर भरण्यासाठी पोकलेनचा वापर होत असल्यामुळे गोदावरी पात्रात मोठमोठी खड्डे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसुल विभागाची व पोलीस यंत्रणा असतांनाही गोदावरी काठाच्या रस्त्यांची ओव्हरलोड वाळू वाहतुकीमुळे दुरवस्था झाली असून महसुल विभाग, पोलीस यंत्रणा व ठेकेदार संगनमताने ठेक्यापेक्षाही जास्त प्रमाणात वाळू उपसा करत असल्यामुळे याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) शासनाच्या वाळु/रेती निर्गती धोरणातील तरतुदीनुसार गेवराई तालुक्यातील (जि.बीड) गोदावरी नदीपात्रात वाळूगट निश्चित करून लिलाव करण्यात येतो. त्यानुसार गेवराई तालुक्यात सन २०१४-१५ या वर्षाकरीता निश्चित केलेले दोन वाळूगट लिलावात गेले होते. तथापि, सन २०१५-१६ या वर्षामध्ये एकही वाळूगट लिलावात गेला नाही. सन २०१६-१७ या वर्षाच्या लिलावाकरीता गेवराई तालुक्यात २ जिल्हास्तरीय व ३ संयुक्त असे एकूण ५ वाळूगट निश्चित करण्यात आले असून, विहीत प्रक्रियेचा अवलंब करून सदर वाळूगटाच्या लिलावाची प्रक्रिया सुरु आहे. मात्र अद्याप सदर वाळूगट लिलावात गेले नसल्याने सदर वाळूगटातून वाळू उत्खनन करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही.

गेवराई तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी भरारी पथक गठीत करण्यात आले आहे. सदर पथकाने सन २०१४-१५ मध्ये केलेल्या तपासणीत वाळूच्या अवैध वाहतूकीच्या ९३ प्रकरणात रुपये १७,९३,०७८/-, सन २०१५-१६ मध्ये ४० प्रकरणात रुपये १,७६,७२,९६१/- व एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत ९४ प्रकरणात रुपये १,०९,३५,३३९/- एवढा दंड वसूल केला आहे. तसेच सन २०१६-१७ या वर्षात ४ प्रकरणांत एम.पी.डी.ए. अधिनियमांतर्गत कारवाई सुरू करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रांझणी-आंबे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४४) * ३०५३१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रांझणी-आंबे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) रस्त्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये दुरूस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर दोन महिन्यातच सदर रस्त्याची पुन्हा दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी सदर रस्त्यांच्या दुरूस्तीबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत तसेच निकृष्ट बांधकाम करणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) रांझणी-आंबे हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ३८ असून या रस्त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/०० कि.मी. या लांबीतील दुरुस्तीचे काम रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत जानेवारी २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरु आहे. परंतु या रस्त्यावर आंबे येथील भिमा नदीवरील वाळू उपसा करुन मोठ्या प्रमाणात क्षमतेपेक्षा जास्त वजनाची वाळू वाहतुक व अवजड वाहनांची वाहतूक होत असल्याने काही ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. याबाबत तहसिलदार, पंढरपूर यांना पत्रान्वये जिल्हा परिषदेमार्फत अवगत केले आहे.

तसेच जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १/०० ते १/६०० कि.मी. मधील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर आहे. ०/८०० ते ४/०० कि.मी. लांबीमध्ये सुधारणा करण्याचे काम खनिज विकास अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव-जामोद (जि. बुलढाणा) येथील जिगांव प्रकल्पांतर्गत येणाऱ्या पडिक शेतीत महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने अतिक्रमण केल्याबाबत

**(४५) * २७२९३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मानेगांव (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथील खाजगी मालकीच्या गट नं. ३६, ३५२, ३५९, ३५३ या जिगांव प्रकल्पांतर्गत येणाऱ्या पडीक शेती संबंधी जळगांव-जामोद येथील महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने नियमबाह्य केलेल्या बनावट कारवाई संबंधी उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी अखिल भारतीय लोकतंत्र सेनानी संघ यांनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी महसूल विभागाच्या संगनमताने जमिनीवरील अतिक्रमण झालेले असून शेकडो ब्रॉस माती चोरीला व विकली गेलेली आहे. तसेच जमिनीतील झाडे व रोप नष्ट केल्याबाबत उपविभागीय अधिकारी (महसूल), जळगांव-जामोद जि.बुलढाणा यांनी निकाल विरोधात देऊन फसवणूक केल्यामुळे सदरचे प्रकरण अप्पर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे निर्णयाअभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निर्णय घेऊन त्याची उच्चस्तरीय चौकशी होऊन संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर निवेदनातील मौजे मानेगाव, ता.जळगाव जामोद येथील गट नं. ३६, ३५२, ३५३ व ३५९ मधील जमीन शासकीय असून भर आकारी गुरे चराईकरीता मुक्रर होती. सदर गटात गावातील काही नागरिकांना देखरेखीकरीता पंच म्हणून नेमण्यात आल्याचे दिसून येते. उक्त जमिनीवर सद्य:स्थितीत अतिक्रमण नसल्याचे मंडळ अधिकारी, मानेगाव यांनी केलेल्या मोका पाहणीअंती आढळून आले आहे. तथापि, सदरहू जमिनीतील शेकडो ब्रास माती चोरून विकल्याबाबत आणि झाडे व रोपे नष्ट केल्याबाबतच्या प्रकरणी उप विभागीय अधिकारी, जळगांव जामोद यांना सखोल चौकशी करण्यास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी सूचना दिलेल्या आहेत.

-----------------

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्याबाबत

**(४६) * २९७४७ श्री.रामहरी रुपनवर, डॉ.अपूर्व हिरे, श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अनेक बसेसमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून अपघात विमा म्हणून प्रत्येक प्रवाशांकडून एक रुपया अधिभार कर घेतला जात असूनही बसमध्ये आग प्रतिबंधक किंवा अग्निशामकाची कोणतीही सोय नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने एस.टी. बसगाड्यांच्या अतिवेगावर नियंत्रण आणणे, चालकांचे वेळोवेळी समुपदेशन करणे आणि आरोग्य विषयक वैद्यकीय तपासण्या व अन्य प्रतिबंधात्मक व सुरक्षितेसंबंधिचे उपाय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ बसमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये नियमानुसार आग प्रतिबंधक उपकरणे बसविण्यात येतात. तसेच, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महामंडळाकडील वाहनांवर वेग नियंत्रण उपकरण बसविण्यात येतात. राज्य परिवहन महामंडळाच्या वाहनांच्या सुरक्षिततेसंदर्भात नियमित देखभाल केली जाते. तसेच, सर्व विभागांमध्ये चालकांच्या सकारात्मक मानसिकतेकरीता तज्ञ समुपदेशकाची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचेद्वारे चालकांना समुपदेशन केले जाते व चालकांची नियमित वैद्यकीय तपासणी केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कारेगाव फाटा ते धर्माबाद (ता.धर्माबाद, जि.नांदेड) रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४७) * ३०४०१ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारेगाव फाटा ते धर्माबाद (ता.धर्माबाद, जि.नांदेड) रस्त्याची दुरवस्था झाली असून सदर रस्ता वाहतुकीस धोकादायक असल्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारेगाव ते धर्माबाद हा रस्ता २० कि.मी. अंतराचा असून सदर मार्ग हा आंध्रप्रदेशात जाण्यासाठी जवळचा मार्ग असून रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या दुरूस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रस्त्यावरील खड्डे पुर्णपणे डांबरमिश्रीत खडीने भरण्यात आले असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे. वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गाच्या सहा पदरीकरणाच्या कामांबाबत

**(४८) * ३०४७२ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरवळ (जि.सातारा) येथे रिलायन्स इंफ्रा व भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गाच्या सहा पदरीकरणाचे काम अतिशय संथगतीने होत असल्याने तीन महिन्यापूर्वी येथील ग्रामस्थांनी हे काम पूर्ण व्हावे यासाठी आंदोलन व शहरात बंद पुकारला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर महामार्गाच्या सहा पदरीकरणाचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत पुणे-बंगलोर महामार्गाचे सहापदरीकरण करण्याचे काम प्रगतीत असून शिरवळ जि.सातारा येथील ग्रामस्थांनी काम संथगतीने होत असल्याबाबत दिनांक ०३/०७/२०१६ रोजी निदर्शने केलेली आहेत. संबंधित प्राधिकरणाचे अधिकारी, स्वतंत्र अभियंता, सवलतदार यांनी दिनांक ०३/०७/२०१६ रोजी उपविभागीय अधिकारी, वाई व उप अधिक्षक, पोलीस वाई यांचेशी सदर समस्येबाबत चर्चा केल्यानंतर सवलतकाराने मागण्यांबाबत कार्यवाहीची हमी दिली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) पंढरपूर फाट्यावरील पाईप मोऱ्यांचे काम अतिक्रमण हटविण्यास गावकऱ्यांनी विरोध केल्याने जलदगतीने होणे शक्य नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी कळविले आहे.

-----------------

**वसई-विरार (जि.पालघर) परिसरात बससेवा सुरू करण्याबाबत**

**(४९) * २८९२५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) परिसरात बसेस बंद केल्यामुळे भुईगांव, निर्मळ, कळंब, रानगांव, गिरीज, अर्नाळा, नंदाखाल इत्यादी या समुद्रकिनाऱ्यावरील गावातून शहरापर्यंत प्रवास करण्याकरीता प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नालासोपारा डेपोतील १६ आणि वसई डेपोतील ९ बसेस बंद झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर बससेवा पुर्ववत सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) राज्य परिवहन पालघर, वसई, नालासोपारा, अर्नाळा या आगारातून राज्य परिवहन वाहतूक करण्यात येत असून भुईगांव, निर्मळ, कळंब, रानगांव, गिरीज या मार्गावर राज्य परिवहन वसई नालासोपारा या आगारातून शहरी वाहतूक सुरु आहे. सदर मार्गावर प्रवाशांची कोणतीही गैरसोय झालेली नाही, तर राज्य परिवहन अर्नाळा नंदाखाल मार्गावर चालणारी राज्य परिवहन शहर वाहतूक सेवा वसई-विरार महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंदनसावरगाव (ता.केज, जि.बीड) व तडेगाव (ता.भोकरदन, जि.जालना) येथील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याबाबत**

**(५०) * ३०४१६ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदनसावरगाव (ता.केज, जि.बीड) येथील एका शेतकऱ्याने कर्जबाजारीपणामुळे व तडेगाव (ता.भोकरदन, जि.जालना) येथील एका शेतकऱ्याने बँकेचे एक लाख रुपयांचे कर्ज फेडू न शकल्याने आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी शासन निकषान्वये आर्थिक मदत वितरीत करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कृषी अधिकाऱ्यांना पदोन्नती, नियमित संवर्ग-२ मध्ये समावेश करण्याबाबत**

**(५१) * २७५२३ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत कृषी अधिकारी संवर्गाची सेवा ज्येष्ठता यादी अनेक वर्षापासून प्रसिध्द करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९९८ पासून अनुसूचित जाती, विमुक्त जमाती व खुल्या प्रवर्गातील कृषी अधिकाऱ्यांची पदोन्नती झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत कृषी अधिकारी हे पद वर्ग-२ (कनिष्ठ) या संवर्गात गणले जात आहे व शासनाच्या इतर कोणत्याही विभागात वर्ग-२ (कनिष्ठ) संवर्ग नसल्याने कृषी अधिकारी पद हे नियमित संवर्ग-२ मध्ये वर्ग करण्याची कृषी अधिकारी संघटनेने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कृषी अधिकाऱ्यांना पदोन्नती, नियमित संवर्ग-२ मध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे अंशतः खरे आहे. कृषी अधिकाऱ्यांच्या दिनांक ०१/०१/२००४ स्थित ज्येष्ठतासुची संदर्भात काही कृषी अधिकाऱ्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल केलेली आहे. तथापि मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या संदर्भातील निर्णयाच्या अधीन राहून कृषी अधिकाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०११ स्थित अंतरीम ज्येष्ठतासुची प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(२) हे खरे नाही. महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब (कनिष्ठ) संवर्गातून महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब संवर्गामध्ये सन १९९८ पासून आतापर्यंत एकूण ५९५ अधिकाऱ्यांना महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब संवर्गामध्ये पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामध्ये अ.जाती प्रवर्गातील ७२, विजाभज प्रवर्गातील ७३ व खुला प्रवर्गातील ३८९ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) कृषी अधिकारी, महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब (कनिष्ठ) संवर्गातून महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब संवर्गामध्ये पदोन्नती देण्यासाठी बिंदू नामावली तपासण्यात येत आहे. महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब (कनिष्ठ) व महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या भिन्न असल्यामुळे महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब (कनिष्ठ) यांना महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब या संवर्गात नियमित करणे संयुक्तिक होणार नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मु.पो.रायते (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील महार वतनी जमिनी मुळ वारसाच्या नावे करण्याबाबत**

**(५२) * २९५१९ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २२७८५ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे रायते (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील महार वतनी जमिनींचे बेकायदा हस्तांतर झाले असून मौजे रायते येथील सर्व्हे नं. १०१/४, १०१/९, १०१/७, १०१/५, ७८ व ७१/७ या मिळकतींच्या जमिनींला अवैधरित्या कुळ लावण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मिळकतीच्या गाव नमुना नंबर ७/१२ मध्ये फेरफार क्र.६२ अन्वये शंकर राघो पवार यांचे नाव संरक्षित कुळ म्हणून नोंद असल्याचे शासनाने दिलेल्या उत्तरात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, फेरफार क्रमांक ६२ ची मुळ संचिका तपासली असता उक्त फेरफार क्रमांक ६२ हा कुळाचा फेरफार नसून हा खरेदीखताचा फेरफार आहे. तसेच त्यामध्ये कोणत्याही संरक्षित कुळाची नोंद नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार फेरफार क्रमांक ६२ हा खरेदीखताचा असून फेरफार क्रमांक ६२ नुसार ३२ ग अन्वये केलेल्या कुळाची चुकीची नोंद रद्द करून गाव नमुना ७/१२ सर्व्हे नंबर १०१/४, १०१/९, १०१/७, १०१/५, ७८ व ७१/७ या मिळकतींची नोंद फेरफार क्रमांक ८०७ वरून मुळ मालक “महार जानू मुकूंद जाधव” यांच्या वारसांच्या नावे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) जानू मुकूंद महार यांच्या मौजे रायते येथील स.नं. १०१/४, १०१/९, १०१/७, १०१/५ व ७१/७ या मिळकतींच्या गाव नमुना नंबर ७/१२ मध्ये फेरफार क्र. ६२ अन्वये शंकर राघो पवार यांचे नाव संरक्षित कुळ म्हणून नोंद आहे, असे विधान परिषद तारांकित प्रश्न क्र. २२७८५ च्या शासनाने दिलेल्या उत्तरात नमूद आहे.
(३) व (४) मौजे रायते येथील गाव नमुना नंबर ६ (फेरफार नोंदवही) पाहता फेरफार क्र. ५५ ते २७० बाबतचे फेरफार पुस्तक संपल्यानंतर पुढील फेरफार पुस्तक फेरफार क्र. २७१ पासून सुरु करण्याऐवजी पुन्हा फेरफार क्र. १ पासून सुरु केल्याचे दिसून येते. त्यानुसार फेरफार क्र. ६२ च्या दोन वेगवेगळ्या पुस्तकात नोंदी झालेल्या आहेत.

त्यापैकी एका फेरफार क्र. ६२, दि.१४/१०/१९५३ अन्वये जानू मुकूंद महार यांच्या मौजे रायते येथील स.नं. १०१/४, १०१/९, १०१/७, १०१/५ व ७१/७ या मिळकतींच्या गाव नमुना नंबर ७/१२ मध्ये शंकर राघो पवार यांचे नाव संरक्षित कुळ म्हणून नोंद आहे.

दुसरा फेरफार क्र. ६२, दिनांक २३/०७/१९२९ हा राघो बंडु पवार यांचेपासून अंतनी सेंट फर्नांडिस यांनी खरेदीने घेतल्याबाबतचा फेरफार असून सदर फेरफार हा अन्य मिळकतींबाबत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.